ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

Volume–IX, Issue– III

May – June 2022

Original Research Article

# प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या मराठी विषयातील शब्दसंपत्ती विकसनासाठी कृतीकार्यक्रमाची निर्मिती व त्यांच्या परिणामकारकतेचा अभ्यास

*जितेंद्र नगराळे,

**डॉ.संजय शालकरावं शिंदे,

*पीएच.डी संशोधक विद्यार्थी,संशोधक विद्यार्थी, शिक्षणशास्त्र, जिजामाता शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नंदुरबार

** प्राचार्य , शिक्षणशास्त्र, जिजामाता शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नंदुरबार

**सारांश :**

*प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची मातृभाषा मराठी समृद्ध होण्यासाठी शब्दसंपत्ती विकसित होणे फार महत्वाचे असते.त्याकरिता पाठ्यपुस्तकावर आधारित प्राथमिक स्तरावर कृतीकार्यक्रमाची निर्मिती व त्यावर आधारित कार्यपुस्तिका तयार करून शब्दसंपत्ती विकस-नासाठी प्रत्यक्ष अंमलबजावणी करता येईल.या उपक्रमातून शब्दसंपत्तीच्या आधारे विद्यार्थ्यांची मातृभाषा मराठी समृद्ध व विकसित होईल.*

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial Use Provided the Original Author and Source Are Credited.

## प्रास्ताविक-

१९३७ साली डॉ.झाकीर हुसेन समितीच्या अहवालात प्राथमिक शिक्षणाचे माध्यम हे मातृभाषा असावे असे सुचविले आहे. तसेच स्वातंत्र्यप्राप्ती नंतर १९६४ साली डॉ.कोठारी आयोगाने त्रिभाषा सूत्रात प्रथम मातृभाषा,द्वीतीय भाषा(हिन्दी) व तृतीय भाषा ही परकीय भाषा म्हणून सुचविले आहे.

मातृभाषा मराठी समृद्ध होण्यासाठी व तिचे स्थान मजबूत होण्यासाठी विद्यार्थ्यांनी आपले विचार,कल्पना,भावना व इच्छा स्पष्ट व समर्पक शब्दातून व्यक्त करणे आवश्यक आहे. आपले अनुभव व्यक्त करतांना परिणामकारक रीतीने मांडता येणे अतिशय महत्वाचे आहे.

भाषिक उद्दिष्टांच्या पातळीवर विचार केल्यास भाषा समजण्याची शक्ति विद्यार्थ्यामध्ये दिसून येत असली तरी त्यांची शब्दसंपत्ति ही फारच कमी प्रमाणात दिसते. परिच्छेदाचा आशय बहुसंख्य विद्यार्थांना सांगता येत नाही,स्पष्ट करता येत नाही,मध्यवर्ती कल्पना सांगता येत नाही.त्यासाठी प्राथमिक स्तरापासूनच मातृभाषा मराठीची शब्दसंपत्ति विकसित करण्याची अधिक आवश्यकता वाटते. तसेच एखादी कृती,विचार पारंपारिक पद्धतीने मांडण्याऐवजी त्यात नाविन्यता,निराळेपणा,आनंद निर्माण करून वेगळेपणाने मांडण्यास मदत करणे व त्यानुसार आवश्यक ते बदल घडवून आणण्यास प्रयत्न करणे आवश्यक

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME–IX, ISSUE– III

MAY – JUNE 2022

Original Research Article

असते.भाषा ही समाजाच्या अस्तित्वासाठी तसेच प्रगतीसाठी आवश्यक आहे.त्यामुळे स्वतःचे विचार समजवून सांगतो व इतरांचे विचार सुद्धा समजून घेतो त्यामुळे सामाजिक जीवन समृद्ध होते. वैचारिक विकास होतो हे वैयक्तिक जीवनात ही फार महत्वाचे असते. विद्यार्थी वाचन करतात पण स्वत:च्या भाषेत प्रश्नांची उत्तरे लिहता किंवा सांगता येत नाही ,परिच्छेद वाचन करतात पण त्याचा आशय सांगता येत नाही व त्यावर दिलेल्या प्रश्नाची अचूक उत्तरे देता येत नाही.

**संशोधनाची गरज-**

शिक्षक हा आपल्या कार्यात परिपक्व असतील तर त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शिकवण्यावर अनुकूल परिणाम दिसून येतो. शिक्षण क्षेत्रात काम करीत असताना प्रामुख्याने प्राथमिक स्तरावरील बालकांचा वयोगट व ते कोणत्या सामाजिक,भौगोलिक व सांस्कृतिक परिसरातून आलेले आहेत.तसेच बालकांचा शालेय स्तरावरील पहिलं पाऊल म्हणजे प्राथमिक टप्पा असतो.घरातून शालेय वातावरणात त्यांचा प्रवेश होत असतो. अध्ययन प्रक्रियेतून वाचन ही मूलभूत प्रक्रिया आत्मसात करायची असते व त्यातूनच शब्दसंपत्तीचा विकास होणे सुद्धा आवश्यक असते.

भाषिक उद्दिष्टे व क्षमताबरोबरच शब्दसंपत्तीवर प्रभुत्व ही संपादन करायचे असते.असे असतांनाही विद्यार्थी अगदी मोजकेच व साधे सोपे शब्द वापरतांना दिसतात. समानार्थी व विरुद्धार्थी शब्दांचा अर्थ मर्यादित दिसून येतो. बोलतांना किंवा लिहितांना वाक्प्रचार,म्हणी इ.चा वापर न करता अगदी साधे वाक्य लिहण्याचा

कल आढळून येतो. तसेच विशेष शब्द,विशेषणे यांचा वापर सुद्धा मर्यादित स्वरूपाचा असतो.

**संशोधनाचे महत्व-**

प्रस्तुत संशोधनातून विद्यार्थ्यामध्ये किती प्रमाणात शब्दसंपत्ती विकसित झाली आहे. शब्दसंपत्ती विकासामध्ये कसा फरक पडणार आहे.शब्दसंपत्ती विकास करीत असतांना येणारे अडथळे कोणते आहेत याची माहिती झाल्यामुळे शब्दसंपत्ती विकासासाठी योग्य उपाययोजना करणे शक्य होते.

विद्यार्थ्यांचा क्षमता विकसित करण्यात पाठ्यपुस्तकांची भूमिका ही महत्वाची असते.प्रस्तुत संशोधनामुळे

शब्दसंपत्तीच्या विकसनामधील अडथळे लक्षात येत असल्याकारणाने कोणकोणते बदल करणे शक्य होईल त्यानुसार पाठ्यपुस्तकातील पूर्व-परिचित शब्द यांचे सहाय्य निर्माण होऊ शकते व त्यावर आधारित किंवा त्यांच्याशी निगडीत शब्दांमुळे आवश्यक ते माहितीत भर घालण्यास उपयुक्त ठरू शकते. या कृतीकार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या आकलन क्षमतेत वृद्धी होईल व त्याचा परिणाम शब्दसंपत्ती विकसनात दिसून येईल.

**जनसंख्या-**

नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्याच्या २२२ प्राथमिक शाळेतील इ.४ थीचे विद्यार्थी.

**न्यादर्श-**

प्रस्तुत संशोधनासाठी नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यातील एकूण १८ केंद्रातील प्रत्येकी दोन प्राथमिक शाळा म्हणजे एकूण ३६ शाळेतील इयत्ता ४ थीच्या विद्यार्थ्यांची न्यादर्श म्हणून निवड केली आहे.

**संशोधन पद्धती** –

प्रस्तुत संशोधनासाठी प्रायोगिक संशोधन पद्धतीचा उपयोग केला जाणार आहे व त्यासाठी एकल गट अभिकल्प निवड केलेला आहे. एकाच गटावर पूर्व चाचणी घेऊन त्यावर कृतीकार्यक्रम राबवून अंतिम चाचणी घेण्यात येईल.

**संशोधन साधन** –

प्रस्तुत संशोधनासाठी शब्दसंपत्तीचा शोध घेण्यासाठी प्रश्नावलि तयार करुन विद्यार्थ्यांची पूर्व चाचणी घेण्यात येणार आहे.या चाचणीमध्ये पाठ्यपुस्तकावर आधारित व त्यांच्या आशयाशी निगडीत अध्ययन पातळीवर आधारित प्रश्न विचारण्यात येणार आहे. ही चाचणी बहुपर्यायी व वस्तुनिष्ठ असणार आहे.

**संशोधनाची कार्यपद्धती -**

पाठ्यपुस्तकाच्या अध्ययन घटकावर आधारीत उद्दिष्टांनुसार विद्यार्थ्यांची पूर्व चाचणी घेऊन व विकसित केलेल्या कृतीकार्यक्रमाची अंमलबजावणी केल्यानंतर उत्तर चाचणी आधारे विद्यार्थ्यांची शब्दसंपत्तीची परिणामकारकता तपासली जाणार आहे.

| अ.क्र | उद्दिष्ट्ये | संशोधन पद्धती | साधने |
|---|---|---|---|
| १ | मराठी भाषा विषयातील पाठयक्रम व पाठ्यपुस्तकातील शब्दांवर आधारीत शब्दसंपत्तीचा शोध घेणे. | वस्तुनिष्ठ प्रश्नावली | प्रश्नावली (पुर्वचाचणी) |
| २. | मराठी भाषा विषयातील शब्दसंपत्ती वर आधारित कार्यक्रम विकसित करणे. | साधन निर्मिती(कार्यपुस्तिका) | शब्दसंपत्तीवर आधारित साधने |
| ३. | निर्मिती केलेल्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे. | प्रायोगिक पद्धत | कार्यपुस्तिका व आधारित साधने |
| ४. | निर्मिती केलेल्या कृतीकार्यक्रमाच्या विद्यार्थांच्या शब्दसंपत्तीवर झालेल्या परिणामांचा अभ्यास. | प्रायोगिक पद्धत | उत्तर चाचणी |

**शब्दसंपत्तीचे मापन** –

प्रस्तुत संशोधन अभ्यासामध्ये प्राथमिक स्तरावरील पाठ्यपुस्तकावर आधारित घटकांनुसार शब्दसंपत्तीचे विकसन करण्यासाठी समानार्थी शब्द,विरुद्धार्थी शब्द,शब्द समुहाबद्दल एक शब्द तसेच म्हणी व वाक्प्रचार घटकांचा वापर करण्यात

येणार आहे. घटकांवर आधारित प्रश्नावलीद्वारे शोध घेऊन विकसित केलेल्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करून विद्यार्थ्यांची अंतिम चाचणी घेऊन परिणामकारकता तपासता येणार आहे.

**संशोधनाचे विश्लेषण -**

प्रस्तुत संशोधनासाठी एकल गट अभिकल्पादवारे पूर्व चाचणी व उत्तर चाचणी यांतील परिणामकारकता तपासण्यासाठी मध्यमान,प्रमाण विचलन,सहसंबध गुणक, टी परीक्षिका व काय स्क्वेअर ई. संख्याशास्त्रीय परिमाणांचा वापर करण्यात येणार आहे.

**परिकल्पना -**

(१) प्राथमिक स्तरावरील इयत्ता ४ थीच्या मराठी विषयाच्या शब्दसंपत्तीत विद्यार्थ्यांच्या पूर्व चाचणी व उत्तर चाचणीतील प्राप्त गुणांच्या सरसरीत सार्थक फरक दिसत नाही.

(२) प्राथमिक स्तरावरील इयत्ता ४ थीच्या मराठी विषयातील मुला-मुलींच्या शब्दसंपत्तीच्या पूर्व चाचणीत सार्थक फरक नाही.

(३) प्राथमिक स्तरावरील इयत्ता ४ थीच्या मराठी विषयातील मुला-मुलींच्या उत्तर चाचणीच्या गुणांमध्ये सार्थक फरक नाही.

**निष्कर्ष** –

विकसित केलेल्या कृतिकार्यक्रमाने विद्यार्थ्यांच्या अध्ययन क्षमतेत वाढ होईल. विद्यार्थ्यांच्या शब्दसंपत्तीत झालेल्या विकासामुळे मातृभाषा मराठीची अभिरुचि वाढेल. विद्यार्थ्यांना कठीण संकल्पना सोप्या पद्धतीने अवगत होतील. विद्यार्थ्यांच्या गुणवतत्तेत वाढ व भाषिक विकास होईल. अध्ययन अध्यापन प्रक्रियेत कौशल्य निर्माण होणार आहे.

विकसीत कार्यक्रमामुळे शिक्षकांना अध्यापन करणे सुलभ होणार आहे. फक्त स्पष्टीकरण न करता कृतियुक्त कार्यक्रमामुळे आकलन क्षमतेत वाढ होईल व उद्दिष्टे प्राप्त होण्यास कालावधी कमी लागेल.कमी कलावधीत जास्तीतजास्त ज्ञान अधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवता येईल. विद्यार्थ्यांच्या मातृभाषा मराठीत शब्दसंपत्ती विकसनामुळे मराठी भाषा समृद्ध होईल. अभ्यासक्रमात,पाठ्यपुस्तकातील आशय विश्लेषनासाठी नवनवीन साधन तंत्राच्या ज्ञान आकलन उपयोजन ही मूल्यमापन तंत्रे शब्दसंपत्तीवरील संशोधन मार्गदर्शक ठरू शकतात.

सदर संशोधनामुळे शैक्षणिक प्रक्रियेत सुधारणा होणार आहे व कमी वेळात जास्तीतजास्त ज्ञान अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवता येणार आहे.

**संदर्भ** –

करंदीकर सुरेश (२००६) मराठी अध्यापन पद्धती, कोल्हापूर, फडके प्रकाशन

कुंडले.भ.बा. (१९९७) मराठी अध्यापन, पुणे, श्री विद्या प्रकाशन

जगताप.ह.ना. (२००६) शैक्षणिक मूल्यमापन, कोल्हापूर, फडके प्रकाशन

भाषिक खेळ (२०१०) जीवन शिक्षण प्रकाशन, म. रा. शै. सं. व प्र. परिषद पुणे

भिंताडे.वि.रा. (१९८९) शैक्षणिक संशोधन पद्धती, पुणे, श्री नित्य प्रकाशन

मराठी बालभारती इ.४थी (२०२०) महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

मुळे. रा.श. आणि उमाठे वि.तु. (१९९८) शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे,औरंगाबाद, विद्या बुक्स प्रकाशन

वाळंबे.मो.रा. (२०१७) सुगम मराठी व्याकरण व लेखन, नितिन प्रकाशन, पुणे

शब्दसंपत्ती वारंवारीता सारणी (२००४) महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

सुरेखा कुंडले,मिनाक्षी बर्वे,संजीवनी महाले (२००८) संशोधन मार्गदर्शिका भाग-२ नाशिक,YCMOU

National curriculum framework (2005) NCF,NCERT, New Delhi

State Level curriculum framework (2010) SCF,SCERT, Pune

***Cite This Article:***

**जितेंद्र नगराळे &**डॉ.संजय शालकरावं शिंदे, (2022).* प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या मराठी विषयातील शब्दसंपत्ती विकसनासाठी कृतीकार्यक्रमाची निर्मिती व त्यांच्या परिणामकारकतेचा अभ्यास, ***Educreator Research Journal***, *Volume–IX, Issue– III, May – June 2022, 9-13.*